**<u>नियमित दिवाणी कब्जा क्र.१९१/२०२१ मधील नि.क्र. २५ वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – ११/०३/२०२४)

सौ. अश्विनी सुशांत घाटगे वि. श्री. श्रीपती बंडू पोवार वगैरे १०

**CNR -MHKO130011922021**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला दिनांक ०७/०२/२०२४ रोजीचा 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द सरसनिरसमानाने वाटणी होवून मिळणेकरीता व मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरचे काम प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास घेणेवरती नेमलेले होते, परंतु प्रतिवादी यांचे विधिज्ञ हे कोल्हापूर येथील न्यायालयामध्ये न्यायालयीन कामकाजामध्ये व्यस्त असल्यामुळे नेमलेल्या तारखेस न्यायालयामध्ये हजर राहून त्यांना वादींचा उलटतपास घेता आला नाही. प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी उलटतपास घेणेस हेतुपुरस्कर टाळाटाळ केलेली नाही. सबब, न्यायाचे कारणास्तव प्रतिवादी यांचेविरुध्द पारित झालेला निशाणी क्र. २४ वरील 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द झालेस वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलटपक्षी तसे न झालेस प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, सदर कामी झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द व्हावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०३.** सदर अर्जाच्या मागील बाजूस वादीने त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. सदरचा अर्ज कायदयातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही. वादी हे निव्वळ काम लांबविणेसाठी तसेच मे.कोर्टाचा अमूल्य वेळ वाया घालवणेसाठी सदरचा अर्ज देत आहेत. सबब, सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. यदाकदाचित सदरचा अर्ज मे.कोर्टाने मंजूर केला तर जास्तीत जास्त दंड करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

**०४.** उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश झाल्याचे दिसून येते. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, वादींचा उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादीस देणे योग्य राहील, तसे न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादीं

मुळे जो विलंब झाला त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादीवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. २५) प्रतिवादीने वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादींविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरी/–.

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – ११/०३/२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.